**<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गिका मुंबई मेट्रो-३</u>**

**विधान भवन मेट्रो स्थानकाचा साचा (स्टेशन बॉक्स) तयार**

**एम.आय.डी.सी. स्थानकानंतर विधान भवन स्थानकाचे (साचा) बांधकाम पूर्ण**

मुंबई, सप्टेंबर २, २०२० - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन ( एम.एम.आर.सी. ) तर्फे विधान भवन मेट्रो स्थानकाच्या साच्याचे काम पूर्ण करण्यात आले असून हे पूर्ण झालेले बांधकाम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन मुंबई मेट्रो ३, पॅकेज १ च्या अंतर्गत आहे . यात तळाची स्लॅब (base slab), मॅझेनाईन स्लॅब (mezzanine slab), कॉनकोर्स स्लॅब (concourse slab) आणि छताची स्लॅब (roof slab) या कामांचा समावेश आहे. पॅकेज एम.आय.डी.सी. मेट्रो स्थानकाचे अशा प्रकारचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

विधान भवन स्थानकाचे बांधकाम 'कट आणि कव्हर' या आधुनिक पद्धतीने करण्यात आले आहे. या स्थानकात प्रवाशांसाठी सात प्रवेश-निकसद्वारांची सुविधा आहे.

"मुंबई मेट्रो ३ मार्गिकेवरील विधान भवन स्थानक हे मेट्रो ३ स्थानकांवर चक्रमान्यांची वर्दळ अधिक प्रमाणात असेल. यास्थानकाद्वारे मंत्रालय , विधान भवन , नवीन प्रशासकीय इमारत जोडले जातील, असे एम.एम.आर.सी. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल म्हणाले.

संपूर्ण विधान भवन स्थानकाचा विचार करता ७५.४५ % बांधकाम पूर्ण झाले आहे. या स्थानकावरून रोज ७५००० पेक्षा अधिक प्रवासी प्रवास करणे अपेक्षित आहे. पॅकेज १ अंतर्गत हुतात्मा चौक , चर्चगेट आणि कफ परेड या मेट्रो स्थानकाची कामे देखील वेगात सुरू आहेत.

समाप्त

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com